# 'द न्यूज बिज टाईम्स'

दि. २८/८/२०२५ पिंपरी, महाराष्ट्र. thenewzbiz@gmail.com वर्ष - दुसरे डिजीटल आवृत्ती




# रिलिटी चेक २ : डिजिटल फेरामधून डिजिटल फसवणुकीविरोधात जनजागृती

**डॉ. डी. वाय. पाटील ए.सी. एस. महाविद्यालयाच्या क्विक हील फाउंडेशन सायबर वॉरियर्स क्लबतर्फे सायबर जनजागृती उपक्रम**

सांगवी, प्रतिनिधी : डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि त्यासोबत बदलत्या सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरीच्या क्विक हील फाउंडेशन सायबर वॉरियर्स क्लब आणि क्विक हील फाउंडेशनतर्फे 'रिलिटी चेक २ : डिजिटल फेरा' या सायबर जनजागृतीपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' या क्लबच्या ब्रीदवाक्यासोबत यावर्षीची 'माझी माहिती, माझी जबाबदारी' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून नागरिकांना सायबर फसवणुकीचे बदलते स्वरूप आणि डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूक करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सायबर वॉरियर्स क्लबचे शिक्षक समन्वयक प्रा. सत्यवान कुंजीर यांनी क्लबची ओळख करून देत केली. त्यांनी डिजिटल अटक, आर्थिक गैरव्यवहार आणि आर्थिक मध्यस्थ यांसारख्या सायबर गुन्ह्यांशी संबंधित संकल्पना सोप्या व व्यवहार्य पद्धतीने समजावून सांगितल्या. डिजिटल फसवणुकीमध्ये गुन्हेगार नागरिकांना विश्वास भीती आणि

शपथ घेतली. स्वतःची वैयक्तिक माहिती आणि डिजिटल ओळख सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाचीच आहे, हा संदेश या शपथेतून देण्यात आला.

लघुनाट्यांच्या माध्यमातून सायबर फसवणुकीचे विविध प्रकार प्रत्यक्ष प्रसंगांच्या स्वरूपात मांडण्यात आले. नेहा माडीवाळकर आणि सिद्धलक्ष्मी पाल यांनी निवृत्तीवेतन फसवणूक, निवेदिता काळे आणि जान्हवी शिंदे यांनी बँक 'केवायसी' फसवणूक, तर ज्ञानेश्वर आगळावे आणि ओम रे यांनी 'पंतप्रधान किसान योजना'च्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीवर आधारित लघुनाट्य सादर केले. मनोरंजक आणि वास्तवदर्शी सादरीकरणातून नागरिकांनी

संवादात्मक भाग ठरला. डिजिटल अटक फसवणुकीचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या उपस्थित व्यक्तीने आपला अनुभव सर्वांसमोर मांडला. या अनुभवातून सायबर गुन्हेगारांकडून निर्माण केला जाणारा मानसिक दबाव, भीती आणि विश्वासाचा गैरवापर याचे वास्तव उपस्थितांसमोर आले.

यावेळी केंद्र शासन प्रशिक्षक व कॉर्पोरेट प्रशिक्षक सुनील शेठ, नगरसेवक शशिकांत कदम, अध्यक्ष सखाराम खेडकर, उपाध्यक्ष प्रकाश घोरपडे, संचालिका अनिता शिंदे, संचालिका शुभांगी देसाई, व्यवस्थापक श्रीकांत देसाई उपस्थित होते. क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्या प्रेरणादायी नेतृत्वातून व क्विक हील फाउंडेशनचे सहयोगी संचालक अजय शिर्के यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने सायबर वॉरियर्स क्लबच्या सायबर जनजागृतीच्या कार्याला सातत्याने दिशा मिळत आहे. तसेच डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाचे चेअरमन पी. डी. पाटील, सचिव सोमनाथ पाटील, प्राचार्य डॉ. रणजित पाटील, सायबर वॉरियर्स क्लबचे शिक्षक समन्वयक प्रा. सत्यवान कुंजीर यांच्या

निष्काळजीपणाचा कसा गैरफायदा घेतात, याबाबत मार्गदर्शन केले. दरम्यान, ईशा काळेकर यांच्या नेतृत्वाखाली उपस्थितांनी सायबर सुरक्षा

आणि कोणताही डिजिटल व्यवहार करण्यापूर्वी पडताळणी करावी, हा संदेश देण्यात आला. कार्यक्रमातील पीडित अनुभवकथन हा विशेष

मार्गदर्शन व सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचविण्याची संधी मिळत आहे.